**नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०२२ मधील नि.४४ वरील आदेश**

**CNR-No-MH-BI50008622022**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ तर्फे दिनांक २५/०८/२०२२ रोजीचा "दावा एकतर्फा चालविणेत यावा" हा आदेश रद्द करुन दाव्यामध्ये लेखी जबाब देण्याची परवानगी मिळावी याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जात प्रतिवादीतर्फे असे नमुद करण्यात आले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्याचे समन्स तामील झालेले आहेत, परंतु प्रतिवादी क्र. ३ ला कोणाचाही आधार नसल्याने व तिला स्वत:चा व तिच्या मुलांचा सांभाळ मोल मजुरी करून करावा लागत असल्याने वकील लावुन प्रकरणात हजर होता आलेले नाही, त्यामुळे तिच्या विरूध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे, सबब नैसर्गिक न्यायदानाच्या हेतुन आदेश रदद करावा व प्रतिवादीस हजर होवून लेखी जबाब दावा देण्याची परवानगीदेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

**०३.** वादीतर्फे म्हणणे दाखल करुन अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा, व बनावट असल्याने प्रतिवादी क्र. ३ चा अर्ज प्रथमदर्शनी खारीज करण्यात यावा. प्रतिवादी क्र. ३ ही दाव्यामध्ये दिलेल्या पत्यावर वास्तव्यास आहे. प्रतिवादी क्र. ३ हिस दाव्याचे समन्स कायदेशीररित्या मिळाले असताना केवळ वादीस न्याय मिळण्यास उशीर व्हावा या उददेशाने प्रतिवादी क्र. ३ ही दाव्यात हजर झाली नाही, त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा अशी विनंती करण्यात

**०३.** प्रतिवादीतर्फे ***विदवान विधिज्ञ श्री. एम.एल.जाधव*** यांचा युक्तीवाद ऐकला. तर वादीतर्फे ***विदवान विधिज्ञ श्री. पी.बी.कदम*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** एकंदरीत अर्ज, म्हणणे, युक्तीवाद व अभिलेखावरील कागदपत्रांचा परामर्श घेतला असता प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ यांना समन्सची बजावणी होवून देखील गैरहजर

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.12.08 19:21:12 +0530

राहिल्याने त्यांच्याविरुध्द "दावा एकतर्फा चालविणेत यावा" हा आदेश दिनांक २५/०८/२०२२ रोजी पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत आदेश रदद करण्याकरीता प्रामुख्याने प्रतिवादी या महिला असल्याने व घरात कर्ता पुरुष नसल्याने मोल मजुरी करून कुटुंबाचा सांभाळ करत असल्याने त्यांना दाव्यात हजर राहता आले नाही असे नमुद करण्यात आलेले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ७ प्रमाणे प्रतिवादीने एकतर्फा आदेशाच्या दिवशी गैरहजर राहणेचे योग्य समर्पक कारण नमुद केले असता न्यायालयास त्यांना दाव्यात हजर होणेची संधी देता येत असल्याचे नमुद आहे. परंतु अर्जात कोणतेही योग्य व समर्पक कारण नमुद नाही, तसेच ऐवढा दीर्घ विलंब का झाला याबाबत देखील कसलाही खुलासा अर्जात नमुद नाही. एकंदरीत निश्चितपणे वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आल्याप्रमाणे प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्ज हा मोघमपणे दिला असल्याचे स्पष्ट होते. परंतु त्याचवेळी याठिकाणी नमुद करण्यात येते की,प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीच्या वाटपाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. तेव्हा दाव्याचे स्वरुप विचारात घेता दावा हा पूर्णपणे व परिणामकारकरित्या निकाली निघणेकरीता,सर्व वाद एकाच दाव्यात सोडविण्याकरीता व सुनावणी दरम्यान सत्य बाबी न्यायालयासमोर येणेकरीता प्रस्तुत प्रतिवादीस दाव्यात हजर होणेची व त्याची बाजू मांडणेची संधी दिल्यास सदर बाबी शक्य होतील,किंबहुना अशी संधी दिल्यास वरील बाबी स्पष्ट होण्याकरीता न्यायालयास मदतच होईल.

**०५.** महत्वपूर्ण म्हणजे अभिलेखाचे अवलोकन केले असता अदयापपावेतो दाव्यात सुनावणीस सुरुवात झालेली नाही, तेव्हा अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादीस हजर होणेची व कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास दाव्याच्या टप्प्यामध्ये फार मोठा बदल होणार नाही. महत्वपूर्ण म्हणजे प्रतिवादीतर्फे करण्यात आलेला मोघम अर्ज तसेच विलंबाचे कारण व खुलासा न दिल्याची बाब विचारात घेता प्रतिवादीवर खर्च आकारुन प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास ते न्यायहिताच्या दृष्टीकोनातून योग्य होईल. तेव्हा एकंदरीतच सर्व बाबीचा विचार करता प्रस्तुत दाव्यात न्यायहेतूने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य वाटते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.12.08 19:21:20 +0530

**०६.** एकंदरीत दाव्याचा कालखंड,प्रस्तुत अर्ज देण्यास झालेला विलंब, अर्जाचे मोघम स्वरुप विचारात घेता, दाव्याचे स्वरुप व दाव्यातील न्यायहित विचारात घेता प्रस्तुत अर्ज खर्चावर मंजूर करणे उचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अर्ज निशाणी क्र.४४ रक्कम रु.१,०००/– (रुपये एक हजार मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. सदर खर्च रक्कम रु.१,०००/– (रुपये एक हजार मात्र) प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीस पुढील तारखेस किंवा तत्पूर्वी दयावी. खर्च रक्कम देणे/भरणा करणे ही आदेशाची प्रमुख अट असेल.

२) वरीलप्रमाणे खर्च रक्कमेची प्रतिवादी क्र. ३ कडून पूर्तता करण्यात आल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरुध्द दिनांक २५/०८/२०२२ रोजी "दावा एकतर्फा चालविणेत यावा" असा पारित करणेत आलेला आदेश रद्द करण्यात येतो व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ७ अन्वये प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्यात हजर होणेची, सुनावणीत सहभागी होणेची व ताकिद अर्जावर म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३) **"दावा येणेप्रमाणे पुढे चालेल ."**

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.12.08 19:21:27 +0530

(एम.बी.सोनटक्के)

दिनांक –०८/१२/२०२५

३रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.